नियमित फौजदारी खटला नं.७०४/२०२२
निशाणी- ३०

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ चा जबाब.</u>

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- गणेश कलगोंडा पाटील
वयः- ३७ वर्षे, धंदाः- पो. हे. कॉ.ब.नं.२६२०
नेमणुक - सायबर पोलीस स्टेशन, अहिल्यानगर

<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-</u>

१. सन २०२२ मध्ये मी सायबर पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्सटेबल या पदावर कार्यरत होतो. दि. १८/०४/२०२२ रोजी पो.नि. ज्ञानेश्वर भोसले यांनी माझी दि. १९/०४/२०२२ रोजी सदर गुन्हयातील मुद्देमाल वैज्ञानिक प्रयोगशाळा नाशिक येथे जमा करण्यासाठी डयुटी नेमली होती. त्यानुसार दि. १९/०४/२०२२ रोजी मी मुद्देमाल प्रमुख पो. हे. कॉ. रावसाहेब हुसळे यांचेकडुन सदर गुन्हयातील मुद्देमालाचे सिलबंद पाकीट प्राप्त केले. त्या पाकिटावर ओपो कंपनीचा मोबाईल आहे असे लिहिले होते. त्यानंतर मी सदर मुद्देमाल नाशिक येथे पोलीस स्टेशनच्या अहवालासह जमा केला. आता मला दाखविलेला अहवाल तोच आहे. त्यावर पो.नि. ज्ञानेश्वर भोसले यांची सही आहे. त्यास <u>नि.३१</u> देण्यात येते. वैज्ञानिक प्रयोगशाळेने दिलेली पोहोच पावती मी सायबर पोलीस स्टेशन येथे जमा केली. आता मला दाखविलेली पोहोच तीच आहे. त्यास <u>नि.३२</u> देण्यात येते. त्यानुसार माझा जबाब नोंदविण्यात आला होता.

सरतपास पूर्ण.

<u>उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. आर. आर. गायकवाड यांचेकडूनः-</u>

२. हे म्हणणे खरे आहे की, सदर मुद्देमालाच्या पाकिटामध्ये काय होते हे मला वैयक्तीरित्या माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, अहमदनगर ते नाशिक अंतर अंदाजे दिडशे किलोमीटर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी कोणत्या वाहनाने गेलो, मी किती वाजता निघालो आणि किती वाजता पोहोचलो याबाबत उल्लेख माझ्या जबाबात नाही. माझ्या जबाबामध्ये माझा ब. नं. २६३० असा नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर ब. नं. माझा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही कोणताही मुद्देमाल घेऊन नाशिकला गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी

कोणताही मुद्देमाल प्रयोगशाळेत जमा केला नाही व जमा केल्याबाबतची कोणतीही पावती मला मिळाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. १८/०४/२०२२ रोजी पो.नि. ज्ञानेश्वर भोसले यांनी माझी दि. १९/०४/२०२२ रोजी सदर गुन्हयातील मुद्देमाल वैज्ञानिक प्रयोगशाळा नाशिक येथे जमा करण्यासाठी डयुटी नेमली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर पाकिटावर ओपो कंपनीचा मोबाईल असे लिहिले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासतील संपूर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.02.02 17:32:21 +0530

( एल. एस. पाढेण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि. ०२/०२/२०२६
अहमदनगर